# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

## // गोषवारा // दि. 23/09/2025

236

**प्रकरण क्र. ( ) :-** नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचकडील पत्र क्र. मनपा/नर/1853/2025-26 दि.10/09/2025 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26(1) अन्वये प्रसिद्ध करणेबाबत, विचार विनियम करणे. (E-2435284)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोराई व मनोरी या 02 गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीबी-4307/108/प्र.क्र.29/07/नवि-11 दि.01/12/2007 च्या अधिसुचनेव्दारे नियुक्ती करण्यात आली होती. उक्त अधिसुचित एकत्रित क्षेत्राची (गोराई-मनोरी-उत्तन अधिसुचित क्षेत्र) विकास योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी तयार करुन ती शासनास मंजुरीसाठी सादर केली असता शासनाने उक्त विकास योजना कलम 31(1) अन्वये अनुक्रमे दि.13/05/2013 व दि.03/06/2016 च्या अधिसुचनेव्दारे मंजुर केलेली आहे. उक्त अधिसुचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असुन संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजुर विकास योजनेप्रमाणे उक्त विकास योजनेची अंमलबजावणी करुन शकणार असल्याने एमएमआरडीए ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन रहात नसल्याने शासनाने गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन असलेली नियुक्ती क्र.टिपीबी-4316/प्र.क्र.257/2016/नवि-11 दि.16/03/2017 रोजीच्या अधिसूचनेद्वारे रद्द करुन सदर मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 अन्वये, 20 वर्षातुन किमान एकदा विकास योजना सुधारीत करणे आवश्यक असल्याने सदरचा कालावधी पुर्ण होणेपुर्वी तीन वर्ष अगोदर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करणेबाबत शासनाने दि.02/02/2012 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे सर्व नियोजन प्राधिकरणाना निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/1489/प्र.क्र.303/18/नवि-13 दि.25/01/2019 (यापूढे याचा उल्लेख शासन निर्णय असा केलेला आहे.) व त्यानंतरचे दि.17/06/2019 रोजी निर्गमित झालेले समक्रमांकाचे शुद्धीपत्रकानसुार राज्यातील सर्वच महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायती, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत

असणाऱ्या सर्वच नियोजन प्राधिकरणांच्या विकास योजना नव्याने तयार करताना अथवा मंजूर असलेल्या विकास योजना भविष्यात सुधारीत करताना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन समानता, सुलभता व अचुकता आणण्याच्या दृष्टीकोनातून भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) संगणक प्रणालीचा वापर करुन (GIS Platform वर) तयार करणेकामी अधिनियमातील कलम 154(1) अन्वये प्राप्त अधिकारात राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार M/s. Techcomm Urban Management Consultant & Service Providers, Thane या संस्थेची निवडपत्र क्र. कामाचा कार्यादेश क्र.मनपा/नर/1855/2023-24 दि.11/09/2023 अन्वये या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच महानगरपालिका क्षेत्रातील 06 गावांची सुधारीत विकास योजना करणेकामी कार्यपद्धतीनुसार आवश्यक कार्यवाही करणेस मा. आयुक्त सो., यांना प्राधिकृत करणेस मा. महासभेने प्रशासकीय ठराव क्र.134 दि.05/07/2023 नुसार मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम अधिनियम 1966 चे कलम 38 सह कलम 23(1) अन्वये विकास योजना सुधारीत करणेबाबतचा इरादा सर्वसाधारण सभा (प्रशासकीय ठराव) क्र.460 दि.23/01/2024 अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.13/03/2024 रोजी प्रसिध्द झाली आहे. त्यानुसार, मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता, विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून नियोजन प्राधिकरण म्हणून, मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर करण्याकरिता, त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्यासाठी मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या पूर्व मान्यतेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये दि.25/04/2024 रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे

महानगरपालिकेने इरादा जाहिर केल्यापासून अस्तित्वातील जमिन वापर नकाशा (ELU) तयार करण्यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार मुळ मुदत 06 महिन्यांची असून वाढीव मुदत 12 महिने इतकी आहे. अधिनियमाच्या कलम 25 अन्वये, नगर रचना अधिकारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे सर्वेक्षण करून, अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (ELU) तयार करण्याची मुदत दि. 12/09/2024 पर्यंत होती. तथापि महानगरपालिकेने इरादा जाहिर केल्यानंतर दि.16/03/2024 पासून दि.05/06/2024 पर्यंत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - 2024 ची आचारसंहिता व दि.24/05/2024 ते दि.05/07/2024 पर्यंत कोकण विभाग पदवीधर ची आचारसंहिता लागू होती, त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनिमय 1966 चे कलम 148(अ) नुसार सदरच्या अनुज्ञेय कालावधीमधुन आचारसंहितेचा कालावधी वगळल्यास मुदतवाढ घेण्याची आवश्यकता राहत नाही. सबब एकत्रित आचारसंहितेचा 03 महिने 20 दिवसा ऐवढा कालावधी वगळून उक्त

अधिनियमाच्या कलम 25 मधील तरतुदीनुसार नगर रचना अधिकारी यांनी विहीत मुदतीमध्ये अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (ELU) 1:2000 तयार करून, सदर नकाशा पत्र क्र.मिभा/मनपा/नर/2398/2024-25 दि.07/10/2024 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांच्या प्रारुप सुधारीत विकास योजनेमध्ये सामाजिक सुविधांची आरक्षणे प्रस्तावीत करण्याकरीता सन 2039 करीता 52000 एवढी लोकसंख्या प्रक्षेपित केली असून झोनिंगकरीता सन 2049 करीता 58000 एवढी लोकसंख्या प्रक्षेपित करण्यात आलेली आहे.

नगररचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, यांचे मार्गदर्शनाखाली नियुक्त संस्थेने प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 26 अन्वये प्रसिध्द करणेकरीता दि.06/08/2025 रोजीच्या पत्रान्वये नगररचना अधिकारी यांच्याकडे सादर केली असुन सदरची प्रारुप विकास योजना संबंधित सर्व तरतुदींचे पालन करुन तयार केली असून उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये जनतेकडुन/नागरीकांकडुन, हरकती/सुचना मागविणेच्या अनुषंगाने प्रसिद्ध करणेकरीता पत्र क्र.मनपा/नर/1853/2025-26 दि.10/09/2025 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे.

सबब वरील प्रकरणात तांत्रिक व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत. व त्या योग्य व कायदेशीर आहेत, असे गृहित धरुन सदरच्या प्रस्तावास मा.आयुक्त तथा प्रशासक सो., यांची मंजुरी मिळणेबाबत गोषवारा सादर करण्यात येत आहे.

**(पु. म. शिंदे)**
**नगररचना अधिकारी**
**तथा**
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव क्र. २३७ दि. २३/०९/2025

**प्रकरण क्र.२३७:-** नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचकडील पत्र क्र. मनपा/नर/1853/2025-26 दि.10/09/2025 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26(1) अन्वये प्रसिद्ध करणेबाबत, विचार विनियम करणे.

**ठराव क्र.२३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोराई व मनोरी या 02 गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन शासन नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र.टिपीबी-4307/108/प्र.क्र.29/07/नवि-11 दि.01/12/2007 च्या अधिसुचनेव्दारे नियुक्ती करण्यात आली होती. उक्त अधिसुचित एकत्रित क्षेत्राची (गोराई-मनोरी-उत्तन अधिसुचित क्षेत्र) विकास योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी तयार करुन ती शासनास मंजुरीसाठी सादर केली असता शासनाने उक्त विकास योजना कलम 31(1) अन्वये अनुक्रमे दि.13/05/2013 व दि.03/06/2016 च्या अधिसुचनेव्दारे मंजुर केलेली आहे. उक्त अधिसुचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असुन संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजुर विकास योजनेप्रमाणे उक्त विकास योजनेची अंमलबजावणी करुन शकणार असल्याने एमएमआरडीए ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन रहात नसल्याने शासनाने गोराई-मनोरी-उत्तन या अधिसुचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन असलेली नियुक्ती क्र.टिपीबी-4316/प्र.क्र.257/2016/नवि-11 दि.16/03/2017 रोजीच्या अधिसूचनेद्वारे रद्द करुन सदर मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 38 अन्वये, 20 वर्षातुन किमान एकदा विकास योजना सुधारीत करणे आवश्यक असल्याने सदरचा कालावधी पुर्ण होणेपुर्वी तीन वर्ष अगोदर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करणेबाबत शासनाने दि.02/02/2012 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे सर्व नियोजन प्राधिकरणाना निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-1818/1489/प्र.क्र.303/18/नवि-13 दि.25/01/2019 (यापूढे याचा उल्लेख शासन निर्णय असा केलेला आहे) व त्यानंतरचे दि.17/06/2019 रोजी निर्गमित झालेले समक्रमांकाचे शुद्धीपत्रकानसुार राज्यातील सर्वच महानगरपालिका, नगरपालिका, नगर पंचायती, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत

असणाऱ्या सर्वच नियोजन प्राधिकरणांच्या विकास योजना नव्याने तयार करताना अथवा मंजूर असलेल्या विकास योजना भविष्यात सुधारीत करताना, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन समानता, सुलभता व अचुकता आणण्याच्या दृष्टीकोनातून भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) संगणक प्रणालीचा वापर करुन (GIS Platform वर) तयार करणेकामी अधिनियमातील कलम 154(1) अन्वये प्राप्त अधिकारात राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार M/s. Techcomm Urban Management Consultant & Service Providers, Thane या संस्थेची निवडपत्र क्र. कामाचा कार्यादेश क्र.मनपा/नर/1855/2023-24 दि.11/09/2023 अन्वये या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्याकरीता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच महानगरपालिका क्षेत्रातील 06 गावांची सुधारीत विकास योजना करणेकामी कार्यपद्धतीनुसार आवश्यक कार्यवाही करणेस मा. आयुक्त सो., यांना प्राधिकृत करणेस मा. महासभेने प्रशासकीय ठराव क्र.134 दि.05/07/2023 नुसार मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम अधिनियम 1966 चे कलम 38 सह कलम 23(1) अन्वये विकास योजना सुधारीत करणेबाबतचा इरादा सर्वसाधारण सभा (प्रशासकीय ठराव) क्र.460 दि.23/01/2024 अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.13/03/2024 रोजी प्रसिध्द झाली आहे. त्यानुसार, मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता, विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून नियोजन प्राधिकरण म्हणून, मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर करण्याकरिता, त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्यासाठी मा. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या पूर्व मान्यतेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये दि.25/04/2024 रोजीच्या आदेशान्वये सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे

महानगरपालिकेने इरादा जाहिर केल्यापासून अस्तित्वातील जमिन वापर नकाशा (ELU) तयार करण्यासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार मुळ मुदत 06 महिन्यांची असून वाढीव मुदत 12 महिने इतकी आहे. अधिनियमाच्या कलम 25 अन्वये, नगर रचना अधिकारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे सर्वेक्षण करून, अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (ELU) तयार करण्याची मुदत दि. 12/09/2024 पर्यंत होती. तथापि महानगरपालिकेने इरादा जाहिर केल्यानंतर दि.16/03/2024 पासून दि.05/06/2024 पर्यंत लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - 2024 ची आचारसंहिता व दि.24/05/2024 ते दि.05/07/2024 पर्यंत कोकण विभाग पदवीधर ची आचारसंहिता लागू होती, त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनिमय 1966 चे कलम 148(अ) नुसार सदरच्या अनुज्ञेय कालावधीमधुन आचारसंहितेचा कालावधी वगळल्यास मुदतवाढ घेण्याची आवश्यकता राहत नाही. सबब एकत्रित आचारसंहितेचा 03 महिने 20 दिवसाचा कालावधी वगळून उक्त अधिनियमाच्या कलम 25 मधील तरतुदीनुसार नगर रचना अधिकारी यांनी विहीत मुदतीमध्ये अस्तित्वातील जमीन वापर नकाशा (ELU) 1:2000 तयार करून, सदर नकाशा पत्र क्र.मिभा/मनपा/नर/2398/2024-25 दि.07/10/2024 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत केलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांच्या प्रारुप सुधारीत विकास योजनेमध्ये सामाजिक सुविधांची आरक्षणे प्रस्तावीत करण्याकरीता सन 2039 करीता 52000 एवढी लोकसंख्या प्रक्षेपित केली असून झोनिंगकरीता सन 2049 करीता 58000 एवढी लोकसंख्या प्रक्षेपित करण्यात आलेली आहे.

नगररचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, यांचे मार्गदर्शनाखाली नियुक्त संस्थेने प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम 26 अन्वये प्रसिध्द करणेकरीता दि.06/08/2025 रोजीच्या पत्रान्वये नगररचना अधिकारी यांच्याकडे सादर केली असुन सदरची प्रारुप विकास योजना संबंधित सर्व तरतुदींचे पालन करुन तयार केली असून उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये जनतेकडुन/नागरीकांकडुन, हरकती/सुचना मागविणेच्या अनुषंगाने प्रसिद्ध करणेकरीता पत्र क्र.मनपा/नर/1853/2025-26 दि.10/09/2025 अन्वये अहवालासह मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. त्यानुसार याबाबतीत आजचे सभेत विचार विनिमय करण्यात आला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ. 2020/प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. राधाबिनोद अ. शर्मा,, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून नगररचना अधिकारी यांनी हस्तांतरीत केलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांचा प्रारुप सुधारीत विकास योजना नकाशा, अहवाल आणि तदअनुषंगिक कागदपत्रांचे आजच्या सभेत अवलोकन केले असता, तो सर्वसाधारण योग्य असल्याचे प्रशासक यांचे मत झाले. त्यानुसार, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या सहा गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26(1) नुसार जनतेकडून/नागरीकांकडुन, सुचना/हरकती मागविणेकरीता प्रसिद्ध करणेस या ठरावाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

**प्रशासकीय सभा दि.२३/०९/२०२५**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- २३८ मिरा-भाईंदर शहरातील उद्याने /मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणेकामी (कालावधी २ वर्ष) आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.(E- १७८७९७३)**

मिरा-भाईंदर शहरातील उद्याने/ मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करून पर्यावरण सुविचार व म्हणी लिहून पर्यावरणाची जनजागृती करणेतसेच माझी वसुंधरा . अंतर्गत पर्यावरणजनजागृती करणे आवश्यक आहे. त्याकरिता विविध उद्याने व मैदाने यांचे रु.९९,०९,६८५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.शहर अभियंता यांनी दि.२५/०७/२०२५ रोजी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात **"उद्यानांची कुंपणे /दुरुस्ती .रंगरंगोटी करणे /"** या लेखाशिर्षामध्ये रु.१५०.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदरकामी सदर लेखाशीर्षामधून खर्च करण्यात येणार आहे.

मिरा-भाईंदर शहरातील उद्याने/ मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणे आवश्यक आहे त्याकरिता अंदाजे रु.९९,०९,६८५/- खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे करिता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.२२/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी मिरा-भाईंदर शहरातील उद्याने /मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग थ्रीडी पेंटिंग करणेकामी (कालावधी २ वर्ष) ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या रु.९९,०९,६८५/- खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस असे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

**प्रशासकीय सभा दि.२३/०९/२०२५**

**प्रकरण क्र. :- २३८ मिरा-भाईंदर शहरातील उद्याने/ मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणेकामी (कालावधी २ वर्ष) आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (E- १७८७९७३)**

**ठराव क्र.** :- २३८

मिरा-भाईंदर शहरातील उद्याने/ मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करून पर्यावरण सुविचार व म्हणी लिहून पर्यावरणाची जनजागृती करणे तसेच माझी वसुंधरा .अंतर्गत पर्यावरण जनजागृती करणे आवश्यक आहे. त्याकरिता विविध उद्याने व मैदाने यांचे रु.९९,०९,६८५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.शहर अभियंता यांनी दि.२५/०७/२०२५ रोजी तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात **"उद्यानांची कुंपणे .रंगरंगोटी करणे / दुरुस्ती /"** या लेखाशिर्षामध्ये रु.१५०.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदरकामी सदर लेखाशीर्षामधून खर्च करण्यात येणार आहे.

मिरा-भाईंदर शहरातील उद्याने/ मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणे आवश्यक आहे त्याकरिता अंदाजे रु.९९,०९,६८५/- खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे करिता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.२२/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अरीबम शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा-भाईंदर शहरातील उद्याने/ मैदाने मधील जागांवर वॉल पेंटींग/स्लोगन पेंटिंग व डिजीटल वॉल पेंटींग /थ्रीडी पेंटिंग करणेकामी (कालावधी २ वर्ष) ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या रु.९९,०९,६८५/- खर्चास प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(राधाबिनोद अरीबम शर्मा, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

प्रशासकीय सभा दि. २३ /०९/२०२५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- २३८ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (E- १९६०१६४)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील ठिकाणचे दुभाजक यांची रुंदी व उंची वाढऊन बांधकाम विभागाने नव्याने दुभाजक विकसित केलेले आहेत. सदर दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करनेकामी अंदाजपत्रक तयार करून त्यास मा. शहर अभियंता यांनी दि.२४/०६/२०२५ तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र. | दुभाजक | रक्कम |
|---|---|---|
| १ | सृष्टी सिग्नल ते डेल्टा गार्डन रोड दुभाजक | रु.२१,०३,२१९/- |
| २ | कनाकिया रोड दुभाजक | रु.४,०७,७५६/- |
| ३ | प्लेझंन्ट पार्क ते डेल्टा गार्डन रोड दुभाजक | रु.१२,६४,०५५/- |
| ४ | एस.के.स्टोन रोड पोलिस चौकी रोड दुभाजक | रु.४,८९,०६३/- |
| ५ | चेणा रोड दुभाजक | रु.६,३५,५६५/- |
| | **एकूण** | **रु.४८,९९,६५८/-** |

उपरोक्त दुभाजकामध्ये शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. त्याकरिता अंदाजे रु.४८,९९,६५८/- खर्च अपेक्षित आहे.

सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात **"उद्याने/ दुभाजक सुशोभिकरण / विकसीत करणे"** या लेखाशिर्षामध्ये रु.१५०.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदरकामी सदर लेखाशीर्षामधून खर्च करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उपरोक्त दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणेकामी ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या रु.४८,९९,६५८/- खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे करिता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.२२/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उपरोक्त दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणेकामी ई-टेंडरींग (ऑनलाईन) पध्दतीने निविदा मागविण्यास व त्याकामी रु.४८,९९,६५८/- येणाऱ्या खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस असे.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त सो यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

**प्रशासकीय सभा दि. २३/०९/२०२५**

**प्रकरण क्र. :- २३८ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.(E- १९६०१६४)**

**ठराव क्र. :- २३८**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील ठिकाणचे दुभाजक यांची रुंदी व उंची वाढऊन बांधकाम विभागाने नव्याने दुभाजक विकसित केलेले आहेत. सदर दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करनेकामी अंदाजपत्रक तयार करून त्यास मा.शहर अभियंता यांनी दि.२४/०६/२०२५ तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र. | दुभाजक | रक्कम |
|---|---|---|
| १ | सृष्टी सिग्नल ते डेल्टा गार्डन रोड दुभाजक | रु.२१,०३,२१९/- |
| २ | कनाकिया रोड दुभाजक | रु.४,०७,७५६/- |
| ३ | प्लेझंन्ट पार्क ते डेल्टा गार्डन रोड दुभाजक | रु.१२,६४,०५५/- |
| ४ | एस.के.स्टोन रोड पोलिस चौकी रोड दुभाजक | रु.४,८९,०६३/- |
| ५ | चेणा रोड दुभाजक | रु.६,३५,५६५/- |
| | **एकूण** | **रु.४८,९९,६५८/-** |

उपरोक्त दुभाजकामध्ये शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. त्याकरिता अंदाजे रु.४८,९९,६५८/- खर्च अपेक्षित आहे.

सन २०२५-२६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात **"उद्याने/ दुभाजक सुशोभिकरण / विकसीत करणे"** या लेखाशिर्षामध्ये रु.१५०.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदरकामी सदर लेखाशीर्षामधून खर्च करण्यात येणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उपरोक्त दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणेकामी ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या रु.४८,९९,६५८/- खर्चास मा.प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे करिता नगरसचिव यांच्याकडे गोषवारा सादर करणेस मा.आयुक्त सो यांनी दि.२२/०९/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अरीबम शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उपरोक्त दुभाजकात शोभिवंत झाडे लाऊन सुशोभीकरण करणेकामी ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या रु.४८,९९,६५८/- खर्चास प्रशासक यांची मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(राधाबिनोद अरीबम शर्मा, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**